



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १४ डिसेंबर २०२४ | अंक ५० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ जिल्हा कडकडीत बंद

## आ.संदीप क्षीरसागर यांनी रस्त्यावर उतरुन केले बंदचे आवाहन



परळी



पाटोदा



येळंबघाट

### आष्टी तालुका कडकडीत बंद

आष्टी : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बीड जिल्हा बंद ला प्रतिसाद देत आष्टी तालुक्यात कड़कडीत बंद पाळण्यात आला. काही दिवसांपूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती.निषेध म्हणून सकल मराठा समाजाच्या वतीने आज दि १३ रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.ह्या बंद मध्ये आष्टी तालुक्यातील धानोरा दौला वडगाव धामणगाव कडा सह आष्टी शहरात व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली. तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातही असेच चित्र पाहावयास मिळाल

### खा.बजरंग सोनवणे यांची मस्साजोग येथे भेट

खासदार बजरंग सोनवणे हे आज सकाळी दिल्ली येथून बीड जिल्ह्यात दाखल झाले. औरंगाबाद विमानतळावरुन ते सरळ मस्साजोग येथे गेले. यावेळी त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. याप्रकरणी पोलीस प्रशासनाने यंत्रणा गतीमान करुन फरार आरोपींचा शोध घ्यावा व सर्वच्या सर्व आरोपींना अटक करुन त्यांना कठोरात कठोर शासन व्हावे अशी मागणी केली.



संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ आज शुक्रवारी (दि.१३) सकल मराठा समाजाकडून बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. बीड, अंबाजोगाई, परळी, माजलगाव, धारुर, केज, वडवणी, पाटोदा, आष्टी, शिरुरकासार या शहरांसह ग्रामीण भागातही कडकडीत बंद पाळण्यात आला. बीड, अंबाजोगाई शहरात सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी दुचाकी रॅली काढून बंदचे आवाहन केले. तर बीड येथे आ. संदीप क्षीरसागर हे स्वतः रस्त्यावर उतरून बंद पाळण्याचे आवाहन करीत असता दिसून आले. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी तगडा बंदोबस्त ठेवला होता. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे पवनचक्कीच्या वादातून अपहरण करुन निर्दयपणे मारहाण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली



नेकनूर



# सोयाबीनच्या हेक्टरी उत्पादकतेत दुप्पटीपेक्षा अधिक वाढ

**बीड जिल्ह्यात हमी भाव खरेदी केंद्रांवर आता सोयाबीन खरेदीस हेक्टरी ९.५० क्विंटल वरून २१.५१ क्विंटल इतकी वाढ**

बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून, धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश आले आहे. बीड व लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदी करण्यासाठी हमी भाव खरेदी केंद्रांना प्रति हेक्टरी उत्पादकतेची जी मर्यादा देण्यात आली होती, त्यात दुप्पटीपेक्षा अधिक वाढ करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रांवर आता प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल इतकी वाढ करण्यात आली असून लातूर जिल्ह्यात देखील प्रति हेक्टरी १२.३० क्विंटल वरून ही मर्यादा वाढवून १९.९९ क्विंटल करण्यात येत असल्याचा निर्णय सहकार व पणन विभागाने घेतला आहे. राज्याचे कृषिमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी यावर्षी हमीभावाने अधिकृत खरेदी केंद्रांच्या मार्फत शेतकऱ्यांची सोयाबीन किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सोयाबीन खरेदीसाठी प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल इतकी मर्यादा पणन विभागाने निश्चित केली होती. या मर्यादेमुळे शेतकऱ्यांच्या समोर उर्वरित सोयाबीनचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे या मर्यादेत वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या प्रमाणात सोयाबीन खरेदी केली जावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी लावून धरली होती. अखेर मुंडेंच्या या मागणीस यश आले असून आता बीड जिल्ह्यात अधिकृत केंद्रांच्या माध्यमातून नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल पर्यंतची सोयाबीन शेतकऱ्यांना हमीभावाने विकता येणार आहे

# संस्कार विद्यालयामध्ये गीता जयंती उत्साहात साजरी



संस्कार विद्यालयाच्या माध्यमिक विभागामध्ये श्रीमद्भगवद्गीता जयंती दिनविशेष कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न करण्यात आला आरंभी प्रमुख मार्गदर्शिका श्रीमती अनिता पुरंदरे व मुख्याध्यापक सतीश गंधे यांच्या हस्ते श्रीकृष्ण व भगवद्गीतेचे पूजन करण्यात आले .यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती पुरंदरे यांनी विद्यार्थ्यांनामानवी जीवनामध्ये भगवद्गीतेचे असणारे महत्त्व विशद करून सांगितले तसेच संक्षेपाने गीतेच्या १८ अध्यायांची नावे कशी लक्षात ठेवायची हेही सांगितले व स्वतः श्रीमद्भगवद्गीता प्रार्थना व श्लोकांचे पठण केले . याचवेळी चिरंजीव गितेश देशपांडे या इयत्ता दहावी शिकणाऱ्या विद्यार्थ्याने श्रीमद् भगवद्गीतेचा बारावा व पंधरावा अध्याय विद्यार्थ्यांकडून सामूहिक स्वरूपात पठण करून घेतला .यावेळी विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला . सदरील कार्यक्रमाचे संचलन श्रीमती प्रज्ञा खके तर आभार प्रदर्शन आर बी भोसले यांनी केले . राष्ट्रगीत व राज्य गीत गायनाने या गीता जयंती कार्यक्रमाची सांगता झाली.



तुषार दिवाळी अंक वसई, दिमाखादार प्रकाशन सोहळ्यात जात या कवितेस सर्वोत्कृष्ट क्रमांक, सन्मानचिन्ह, दिवाळी अंक, सन्मानपत्र देऊन मा. प्रा. व्याख्याते श्री. महादेव ईरकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.. तुषार पब्लिकेशनचे डॉ अरूण धायवट यांच्या उपस्थितीत

# मराठा सेवा संघ धारूर तालुकाध्यक्षपदी कृष्णा थोरात तर शहराध्यक्षपदी शुभम निक्ते यांची निवड

**धारूर(प्रतिनिधी)** शहरात दि:१२/१२/२०२४ रोजी मराठा सेवा संघ बैठक आयोजीत करण्यात आली होती या बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गोकुळ जगताप व संदीप भैया शिनगारे हे उपस्थित होते. बैठकीत मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी विविध मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी मराठा सेवा संघाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा सांगण्यात आला तसेच समाज जाती जाती मध्ये विखुरलेला होता तर तो समाज बहुजन समाज म्हणून सर्व जातीला सोबत घेवून जाणारी संघटना म्हणजेच मराठा सेवा संघ आहे असे सांगण्यात आले.या बैठकीत सर्वानुमते धारूर तालुकाध्यक्षपदी शिवश्री कृष्णा थोरात यांची निवड करण्यात आली तसेच शहराध्यक्षपदी शिवश्री शुभम



निक्ते यांची निवड करण्यात आली तसेच तालुका सचिव म्हणून शिवश्री शशिकांत साखरे यांची निवड करण्यात आली.या बैठकीला शहरातील श्रीनिवास दरेकर,सचिन थोरात,लक्ष्मण मोरे सर,अॅड.रवि सावंत,संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष रमेश मोरे, पवन निक्ते, अॅड.युवराज फुन्ने यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.या बैठकीचे सूत्रसंचालन रमेश मोरे यांनी केले तर आभार श्रीनिवास दरेकर यांनी मानले....

# स्व.पोलीस हेडकॉन्स्टेबल भारत अंबादासराव शिंदे पा.यांच्या जयंतीनिमित्त संस्कृती विद्यालयात शालेय साहित्य आणि फळ वाटप

बीड येथील प्रसिद्ध उद्योजक जय भवानी ग्रुप ऑफ महाराष्ट्र चे सर्वेसर्वा श्री.रुपेश भैय्या शिंदे यांनी त्यांचे वडील स्व.भारत अंबादासराव शिंदे पा.पोलीस हेडकॉन्स्टेबल बीड येथे यांच्या ५६ व्या जयंतीनिमित्त संस्कृती विद्यालयात ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप केले श्री.रुपेशजी शिंदे सरांची ही कृती इतरांना मार्गदर्शक आहे,यावेळी प्रथम संस्थेचे अध्यक्ष डॉ.दत्ता नलावडे सर यांनी रुपेश भैय्या शिंदे आणि त्यांच्या सर्व मित्र परिवाराचा संस्थेच्या वतीने सत्कार केला व स्वागत केले.इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत च्या विद्यार्थ्यांना शिंदे सर यांच्यातर्फे चित्रकला साहित्य, वही,पेन,पुस्तक आणि फळे देऊन विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यात आली व मुलांचे कौतुक करण्यात आले.सर्व विद्यार्थ्यांनी शालेय साहित्य आणि फळे व खाऊ चा आस्वाद घेतला बालगोपाळांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून मनस्वी समाधान वाटले अशी प्रतिक्रिया श्री.शिंदे सरांनी यावेळी व्यक्त केली. यावेळेस उपस्थित रुपेश भैय्या शिंदे यांचा मित्रपरिवार टेनिस कोच अतिक शेख सर, समाजसेवक अक्षय साखरे,वैभव जाधव, स्वप्निल शेळके ,सौरभ निंबाळकर,आसेफ पठाण,प्रवीण थोरात,रवी शेंदाडे, उपस्थित होते,शेवटी डॉ. दत्ता नलावडे सर यांनी शिंदे सरांचे आभार मानले दरवर्षी जयंतीनिमित्त शिंदे सर संस्कृती विद्यालय येथे मुलांना अशा प्रकारे मदत करत असतात त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे.



# बीड जिल्हा बंदच्या हाकेला प्रतिसाद देत लिंबागणेश येथे कडकडीत बंद




लिंबागणेश:- ( दि.१३ ) केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येच्या निषेधार्थ व या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी व कठोर कारवाईच्या मागणीसाठी सकळ मराठा समाज व विविध राजकीय पक्ष यांनी आज दि.१३ शुक्रवार रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या हाकेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत लिंबागणेश येथील विविध व्यापारी, हॉटेलचालक, यांनी स्वतःहुन दुकाने बंद ठेवून बंद पाळला. स्व.सरपंच संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत या प्रकरणातील आरोपींच्या अटकेची मागणी करतच यामागील सुत्रधार, राजकीय दबावाखाली काम करणारे पोलिस प्रशासनातील अधिकारी यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यात यावी अशी मागणी लिंबागणेशकर ग्रामस्थांनी केली आहे.

# संतोषच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

## खा.बजरंग सोनवणे म्हणाले मास्टमाईड सुटता कामा नये

## संतोष देशमुख कुटुंबाच्या भेटीत खा.बजरंग सोनवणे गहिवरले

**बीड/प्रतिनिधी**

मस्साजोग येथील तरुण सरपंचाचे अपहरण करुन, त्यांना टॉर्चर करीत अमानवीय हत्या घडवून आणली आहे. त्यामुळे या घटनेतील मास्टरमाईडचा शोध लावून सर्वांना कठोर शिक्षा व्हावी.ज्या कारणासाठी हत्या करण्यात आली, त्या खंडणी प्रकरणातील सर्वच आरोपींना १५ डिसेंबरपर्यंत अटक करण्यात यावी, अन्यथा जनतेचा आक्रोश आटोक्यात ठेवणे अशक्य होईल, असा स्पष्ट इशारा खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.दरम्यान खा. बजरंग सोनवणे यांनी दिल्लीहून येताच शुक्रवार (ता.१३) सकाळी पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी मस्साजोग येथे स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या परिवाराची सांत्वनपर भेट घेऊन आदरांजली वाहिली.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे. एक तरुण उमदा माणूस अतिशय अमानवीय पद्धतीने जिवंतपणे



मारला गेला आहे. त्यामुळे केज पोलिस ठाण्यात या प्रकरणाचे तपास अधिकारी, पोलीस उपअधीक्षक कमलेश मीना यांची भेट घेऊन, पोलिसांच्या हलगर्जीपणाचा जाब विचारत सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली. बीड जिल्ह्यात या अमानुष घटनेच्या निषेधार्थ शांततापूर्ण बंद पाळण्यात आला आहे.जिल्ह्यात प्रचंड संताप व्यक्त होत असून, पोलिस प्रशासनाने त्वरित पावले उचलून दोषींवर कारवाई केली नाही, तर याचा उद्रेक होईल.यासाठी प्रशासनाने तत्काळ न्याय देण्याची भूमिका घ्यावी, केज पोलिसांनी वेळीच पावले उचलली असती तर संतोष देशमुख यांचा जीव गेला नसता, त्यामुळे यानंतर तपास कसलाही हलगर्जीपणा पोलिसांनी करता कामा नये. असे खडेबोल खा.बजरंग सोनवणे यांनी सुनावले.जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत आपण शांत बसणार नाही.अशी भूमिका त्यांनी यावेळी स्पष्टपणे बोलून दाखवली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १४ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## जॉर्ज सोरोस आणि काँग्रेसचा हात

स्वसामर्थ्याच्या प्रामाणिक जाणिवेचा अभाव असलेले प्रत्येक संकटासाठी इतरांस बोल लावतात तर खरे कर्तृत्ववान श्रेयासह अपश्रेयाचेही धनी होण्यात मागेपुढे पाहात नाहीत. व्यक्तींस लागू असलेला हा नियम व्यक्तिसमूहांच्या प्रदेशासही लागू होतो. या चिरंतन सत्याची जाणीव नव्याने करून देणाऱ्या दोन घटना. पहिलीत अमेरिका आपणास अस्थिर करण्याच्या प्रयत्नात असल्याचा अप्रत्यक्ष ठपका आपल्याकडून लावला गेला आणि दुसरीत धनाढ्य गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांच्यावर आपल्याकडून तशाच स्वरूपाचा आरोप केला गेला. हे वयोवृद्ध सोरोस काँग्रेसच्या सोनिया गांधी यांच्याशी हातमिळवणी करून जम्मू-काश्मीर आपल्यापासून तोडण्याचा घाट घालत असल्याचे काही सरकारी उच्चपदस्थांचे म्हणणे. या विद्वत्तापूर्ण भाकितावर हसावे की रडावे असा प्रश्न. एरवी हे असले विनोदी वाङ्मय कोणा यूट्यूबरने वगैरे प्रसवले असते तर त्या निर्बुद्ध बडबडीकडे दुर्लक्ष करण्याची सोय होती. या बाबत ती नाही. कारण पाकिस्तानला तीन प्रत्यक्ष युद्धांत आणि असंख्य अप्रत्यक्ष संघर्षांत जे जमले नाही ते वयाच्या नव्वदीतले हे सोरोस पंचाहत्तरीतल्या, तब्येतीने अशक्त अशा सोनिया गांधी यांच्या साह्याने करून दाखवतील असे मानणाऱ्यांस काय म्हणावे? त्याच वेळी; अर्थव्यवस्थेत आपल्यापेक्षा साधारण पाच पट मोठी अमेरिका संरक्षण साहित्य/ विज्ञानसंशोधन/ कारखानदारी आदी क्षेत्रांत तुलनाही होऊ शकत नाही इतक्या अगण्य भारतास पाण्यात पाहते असे वाटून घेणाऱ्यांसही काय म्हणावे? त्यासाठी बौद्धिक पातळीवर इलाजापलीकडचे दिव्यांगत्वच हवे. अशांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढती असल्याने या युक्तिवादांचा समाचार घेणे आवश्यक ठरते. याचे कारण हे आताच होते आहे असे नाही. इंदिरा गांधी यांच्या पराभूत मानसिकतेतील कालखंडात आपल्याकडे असे आरोप अनेकदा झाले. ‘परकीय हात’, ‘परदेशी शक्ती’ इत्यादी शब्दप्रयोग त्या वेळी वारंवार होत. भारतासमोरील सगळ्या अडचणी, संकटे, सरकारी अकार्यक्षमता इत्यादीस त्या वेळी एकच घटक जबाबदार होता. ‘परकीय हात’ हे परदेशांकडे बोट दाखवणे त्या वेळी इतके सर्रास होते की त्या वेळी विरोधी पक्षांत असलेले अटलबिहारी वाजपेयी आदी नेते इंदिरा गांधी यांची सर्रास खिल्ली उडवत. कोणा एका नेत्याच्या पत्नीस दिवस राहिले तर त्यामागे तर परदेशी हात नाही ना असे विचारण्याइतका चोथा या कारणाचा त्या वेळी विरोधकांनी केला होता. आता त्याच विरोधकांचे वंशज सत्तेवर आहेत आणि पुन्हा एकदा ‘परदेशी हात’ भारतीय राजकारणात वळवळू लागला आहे. हा योगायोग बरेच काही सूचित करतो. ‘अमेरिकेचे ‘डीप स्टेट’ भारतात अस्वस्थता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे’ हे सरकारी विधान आणि सोरोस आणि सोनिया गांधी यांच्यातील कथित व्यवहारांबाबत काही सत्ताधाऱ्यांची टीका यांतून हा ‘परदेशी हात’ डोकावतो. प्रथम अमेरिकी ‘डीप स्टेट’च्या कटकारस्थानाबाबत. ‘डीप स्टेट’ म्हणजे सरकारच्या साहाय्याने पण सरकारपरोक्ष गुप्त चळवळी, यंत्रणा यांचे सुरू असलेले गुप्त उद्योग. अलीकडच्या काळात तुर्की या देशात हा शब्दप्रयोग वापरला गेला. आपला संबंध आहे तो अमेरिकेतील ‘डीप स्टेट’शी. म्हणजे त्या देशाच्या सीआयए, एफबीआय वगैरे यंत्रणांतील पाताळयंत्री भारताविरोधात काही कारस्थाने करीत आहेत आणि त्यास सरकारी उच्चपदस्थांची फूस आहे असा त्याचा अर्थ. पण या संदर्भात प्रश्न असा की अचानक आपल्या मर्द-मजबूत, पुरुषार्थी वगैरे सरकारातील अत्यंत हुशार, कार्यक्षमादी मंत्र्यांस अचानक ‘डीप स्टेट’ची गरज का भासावी? अदानी हे त्याचे उत्तर. ते औपचारिकपणे कोणी मान्य करणार नाही. तथापि या सरकारचा इतिहास लक्षात घेतल्यास त्यांची कार्यपद्धती लक्षात येईल. आपल्यावर शेकेल, आपणास चिकटेल असे काही आरोप, टीका विरोधकांकडून सुरू झाली की तिचे प्रत्युत्तर त्यांच्यावरील आरोपाने द्यायचे किंवा विषय बदलून टाकायचा असा या सरकारचा खाक्या. दिल्लीपासून मुंबईपर्यंत तो अनेकदा दिसतो. म्हणजे कोकणातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पडल्यावर मध्येच बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीचे ‘एन्काउंटर’ होते आणि चर्चेची दिशा बदलते. किंवा निवडणुकीत ऐन भरात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांचे बिटकॉइन गैरव्यवहारातील आरोपीशी न झालेल्या संभाषणाचे रेकॉर्डिंग बाहेर येते आणि विरोधकांचा पुढचा वेळ खुलासे करण्यातच जातो. तसे हे. आता खरे तर अदानी प्रकरण हे काही सरकारने स्वत:च्या अंगास लावून घ्यावे असा विषय नाही. या देशातील एक खासगी उद्योजक आणि त्यावर अमेरिकी नियामक यंत्रणांनी केलेली कारवाई, इतकाच काय तो मुद्दा. ही कारवाई किती खरी, किती खोटी, योग्य- अयोग्य वगैरे अद्याप काहीही समोर आलेले नाही. पण तरीही या उद्योगपतीच्या बचावार्थ जणू काही घरचेच कार्य असल्याच्या थाटात केंद्रीय मंत्री सरसावले. आताही आणि याआधीही. त्यामुळे भारतीय नियामक यंत्रणांची क्षमता आणि प्रामाणिकपणा यावर प्रश्न निर्माण झाले. त्याबाबतही खुलासा करण्यात सदर नियामकांपेक्षा सत्ताधारीच अधिक उतावीळ. या कार्यकारणभावासंदर्भात त्यामुळे काही प्रश्न निर्माण केले गेले

# ती आणि मी भाग ७

वाचक मित्र मैत्रिणींनो कथेला भरभरून प्रेम दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे मनापासून आभार व कथेचे भाग उशीरा प्रकाशित होत आहेत त्याबद्दल क्षमस्व. पण या पुढे कथेचे नियमित भाग येत राहतील मैत्रिणीचा कॉल कट करुन ती तिच्या रूम मधून हॉल मध्ये येते तर पाहते की तिची आई चक्कर येऊन पडलेली असते. ती :- आई.. आई.. काय झालं तुला ( आईची शुद्ध हरवलेली असते तिला काही सुधरत नाही ती तिच्या बाबांना कॉल करते.) घाबरतच बोलते कशश्रश्रे बाबा कुठे आहात बाबा :- काय झालं बेटा तुझा आवाज असा का येत आहे. ती :- बाबा लवकर घरी या आई.. म्हणून रडू लागते बाबा :- काळजी करू नकोस बाळा मी खालीच आहे आलो लगेच. फोनवरच संभाषण ऐकून बाजूला उभे असलेले मित्र विचारू लागतात काय झालं. पण त्यांना उत्तर न देता थेट ते त्यांच्या फ्लॅटकडे निघाले, व मागे मागे मित्र पण आले. दार उघडून आत येतात. ती :- बाबा आईला काय झालं बघाना तिचे रडून रडून हाल झालेले असतात. तिचा तिच्या आईवर खुप जीव असतो बाबा :- गडबडून काय झालं हिला अचानक.. ती :- माहिती नाही बाबा मी जेंव्हा रूम मधून बाहेर आले तेंव्हा आई अशी मला बेशुद्ध अवस्थेत पाडलेली दिसली. म्हणून मी तुम्हाला कॉल केला. मित्रा पेकी एक जण बोलतो काही काळजी करू नका मी ॲम्बुलन्स बोलावली आहे तितक्यात ॲम्बुलन्सचा आवाज येतो चला लवकर यांना हॉस्पिटल मध्ये नेवू थोड्या वेळाने सगळे हॉस्पिटल मध्ये येतात अजून ही आई शुद्धीवर आलेली नसते. सर्व जण काळजीत असतात डॉ त्यांना चेक करतात व इंजेक्शन देऊन सांगतात की काही वेळाने यांना शुद्ध येईल नंतर आपण काही टेस्ट करूया नेमक काय झालं ते आपल्याला कळेल व डॉ निघून जातात. बाबाचे अजूनही सोबत असतात बाबा मित्रांना म्हणतात तुमची खूप मदत झाली. नाही तर माझ आणि माझ्या मुलीच या परिस्थितीत काय झालं असत काय महिती. मित्र :- अरे मित्र मित्राच्या मदतीला धावून नाही आले तर मित्र म्हणून घेण्याचा काय अर्थ. ते मित्रच असतात जे अर्ध्या रात्री पण मित्राच्या एका हाकेला ओ देतात. बाबा :- अगदी बरोबर आहे तुमचं, तुम्ही माझ्या सोबत खूप वेळ झाल आहात तुम च्या घरचे काळजी करत असतिल तुम्ही जाऊ शकता काही लागलच तर मी कळेलच मित्र :- घाबरू नकोस आम्ही आमच्या घरी सांगितल आहे त्यामुळे घरचे निवांत आहेत व आम्हाला सूचना केली आहे या परिस्थितीत तुमची खरी गरज तिथे आहे. बर तू काही खाल्लं नाही आम्ही काही तुमच्या दोघांसाठी घेऊन येतो.. बाबा :- तुम्ही सर्व जण पण काही खाऊन घ्या मला माहिती आहे तुम्ही पण काही खाल्लं नाही.. मित्र :- जाता जाता.. हो रे आमची काळजी करू नको.. सगळे निघून जातात तितक्यात तिचा फोन वाजतो ती इतकावेळ आईच्या विचारात गुंग होती दचकून बघते तर त्याचा कॉल आलेला असतो. थोडे बाजूला जाऊन ती कॉल घेते तो :- मग काय विचार केला आहेस.. ती :- रडवेल्या आवाजात अरे ऐकणा तो :- मला काही ऐकायच नाही तू काय ठरवले ते सांग अगोदर. ती :- काही बोलणार की तिकडून कॉल कट झाला व ती विचारतात गुंग झाली. हा असा कसा करू शकतो माझ काही ऐकून न घेता सरळ सरळ कॉल कट केला. मी पारख करण्यात कुठे चुकत तर नाही ना. असे एक ना अनेक विचारांनी तिला भंडावून सोडले. ( बाबाच्या आवाजाने तिची विचारांची शृंखला भंग होते ) बाबा :- बेटा काय झालं इतका कसला विचार करत आहेस,मी तुला किती हाका मारल्या तुझं लक्ष कुठे... ती :- काही नाही बाबा ते आई.. आई कशी आहे आता.. बाबा :- अजून बेशुद्ध आहे डॉ ने काही टेस्ट सांगितल्या आहेत ती शुद्धीवर आली की करू बाळा हे घे एटीएम काही पैसे काढून आन लागतील आपल्याला... आणि दादाला पण कॉल करुन या गोष्टीची कल्पना दे. ती :- हो बाबा जाते आणि दादाला पण कळते ( ती हॉस्पिटल मधून बाहेर पडते अगोदर दादाला कॉल करुन सांगते व मग तिच्या मैत्रिणीला कॉल करुन त्याच्या या नव्या रुपा बद्दल सांगते तिची मैत्रीण चकित होते...) तर वाचक मित्र, मैत्रिणींनो हा भाग कसा वाटला हे नक्की कळवा. पुढे ही कथा आणखी रंजक होणार आहे. आपले अभिप्राय बहुमूल्य मार्गदर्शक असतात त्यामुळे माझ्या लिखाणात सुधारणा होते तर बिनधास्त चांगले, वाईट जे काही असेल ते हक्काने सांगायला विसरू नका. लवकरच. ‘ती आणि मी’ या कथेचा पुढील भाग घेऊन येत आहे.

sgmule9028@gmail.com
सचिन कमल गणपतराव मुळे... परभणी
९७६७३२३३१५

# संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे ही काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील ‘आम्ही भारताचे लोक’ ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७५ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा नियोजित कामे संबंधित यंत्रणानी तातडीने पुर्ण करावे - जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्हा वार्षिक योजनेचा मंजूर निधी विविध विकास कामांवर खर्च करुन नियोजित कामे संबंधित यंत्रणानी तात्काळ पुर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेची आढावा बैठक जिल्हा नियोजन



समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिपकुमार माळोदे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह संबंधित विभागाच्या विभागप्रमुखाची उपस्थित होती. जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, संबंधित यंत्रणानी तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत. सदरची मंजूर कामे तातडीने देऊन पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सन २०२५-२६ चा आराखडा प्रारुप आराखडा आयपास प्रणालीवर भरुन सादर करण्याच्या सूचना केल्या. मंजूर संपूर्ण निधीचा विनीयोग करुन निधी परत जाता कामा नये, याची खबरदारी घ्यावी. तसेच मागील वर्षीची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले.

# बीड गोळीबार प्रकरणी आमदाराचा समर्थक आरोपी असल्याने आमदाराची चौकशी करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची पोलीस प्रशासनाकडे मागणी

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१३ : जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, म्हणत बोंब ठोकणाऱ्या बीडच्या आमदाराशी संबंधित व्यक्ती गोळीबार प्रकरणात आरोपी आहे. अशी प्रकरणे बीड विधानसभा मतदारसंघात आमदाराच्या वरदहस्तामुळे सातत्याने घडत आहेत. त्यामुळे गोळीबार प्रकरणाची सखोल चौकशी करून आमदाराला सहआरोपी करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.पत्रकात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना



अटक करून कडक कारवाई करावी ही आपली सुरुवातीपासूनच भूमिका आहे. या प्रकरणात बीडच्या आमदाराने राजकारण करत राजकीय भांडवल होईल, अशी विधाने केली. ती विधाने करण्याचा नैतिक अधिकार त्यांनी केव्हाच गमावलेला आहे. गत पाच वर्षात व्यापारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यापलीकडे त्यांनी दुसरे काहीही केलेले नाही. मागे बीडमध्ये आदित्य कॉलेजजवळ झालेल्या खून प्रकरणात आमदाराचे जवळचे नातलग आरोपी आहेत. दोन-अडीच वर्षापूर्वी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ॲड.राजेंद्र राऊत यांच्यावर राजकीय दबावातून आमदारांनी खोटी ॲट्रॉसिटी व ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करायला लावले. माझ्यासह सहकाऱ्यांवर हनुमंत वाघमारे यांच्याकरवी करायला लावलेली ॲट्रॉसिटी देखील पूर्णपणे खोटी ठरली. तसेच सतीश पवार यांच्या संपत्तीच्या प्रकरणात वारंवार हस्तक्षेप करून आमदाराने खंडणी गोळा करण्यासाठी गुंड पाठविले. त्यावेळी रजिष्ट्री कार्यालयात हल्ला घडवून आणला, त्यावेळी आत्मसंरक्षणासाठी परवानाधारक शस्त्रातून सतीश पवारांना हवेत गोळीबार करावा लागला, हा इतका मोठा वाद आमदारांनी निर्माण केला. अशा खोट्या केसेस करण्यासाठी काही दलित बांधवांना हाताशी धरून त्यांचा वापर केला जातो. त्यामुळे समाजात तेढ निर्माण होते. हा आमदाराचा इतिहास पाहता बीडच्या गोळीबार प्रकरणात देखील त्यांचा हात असू शकतो, आरोपी हा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे धडे शिकविणाऱ्या बीडच्या आमदाराची देखील कसून चौकशी व्हायला हवी, अशी मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

### मस्साजोग खून प्रकरणाचे राजकारण करू नये; पवनचक्की प्रकरणात चौकशी कराच

केज तालुक्यातील मस्साजोग खून प्रकरणाचे बीडच्या आमदाराने राजकरण करू नये. आरोपींसोबतचे माझे फोटो व्हायरल करून खोटे आरोप केले जात आहे. माझी कोणतीही चौकशी करावी, मी कसल्याही चौकशीसाठी तयार आहे. यात माझा कुठेही संबंध आढळून आल्यास राजकीय संन्यास घेईल. परंतु बीडमध्ये आमदाराचा वरदहस्त असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे. त्यामुळे पवनचक्कीच्या प्रकरणात बीडच्या आमदाराचीही कसून चौकशी व्हावी. कॉल डिटेल्स तपासवेत. त्यासाठी ते तयार आहेत का? हे बगलबच्चांनी आमदाराला विचारून स्पष्ट करावे. याबाबत आमदाराने मीडियासमोर पुढे येऊन बोलण्याची तयारी दाखवावी, असे आव्हान डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

# एका वेदनेतून..

माणसाने सोने होण्यापेक्षा परिस होऊन कायम स्वरूपी आनंदी, स्वच्छंदी, निर्भेळ, आत्मीय नाते निर्माण करावं अन ते जीवापाड जपावं. चिंता, विवंचना, दुःख,संकट, अडचणी कोणाला नसतात.? आपली ज्याला खरंच गरज आहे, किंबहुना आपल्या प्रेमाच्या दोन शब्दांनी जर एखाद्याचे दुःख हलकं होत असेल, एखाद्याला आत्मीय आनंद मिळत असेल तर त्यात काय गैर आहे? जीवनाच्या वाटेवर आनंदाची उधळण करत जा.....वर वर पाहता ब-याच वेळा सर्व काही आभासीच असतं.मनाच्या ओढीची भाषा ज्याची त्यालाच कळते.उपेक्षेपोटी झालेली जखम, त्याची सल, त्यामुळे झालेलं दुःख डोळ्याआड पाणी लपवते. पण मनाला त्याच व्यक्तीची काळजी बेचैन करते.भावना आणि व्यवहार यांचा मेळ संवेदनाक्षम मनाला घालता आला तर? भावनिक नात आणि व्यावहारीक नात यांचा मेळ कधीच जमणार नाही का? म्हणूनच समजून घे मनाची घालमेल. तुझ्या आयुष्यातील थोडे क्षण त्यासाठी राखीव ठेव. अगदी तुझी इच्छा नसली तरी. आनंद वाटत जा. दुस-याला सुख देण्यात अन त्याच्या समाधानी चेह-यावरील आनंद पाहण्यात काय आनंद असतो ते अनुभव. परमसुखाच्या समाधीचा अननभूत आनंद नक्कीच मिळेल तुला. आनंद वाटत जा...उधळत जा.....

स्वलिखित
**आशारेखा**

## आंतरमहाविद्यालयीन कराटे स्पर्धेत भारत कराटे अकॅडमीला घवघवीत यश




प्रतिनिधि –सोलापुर
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत पहिल्यांदाच कराटे खेळाचा सामावेश महाविद्यालयीन स्पर्धामध्ये करण्यात आला होता सदर स्पर्धा या व्ही जी शिवदारे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सोलापूर येथे संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये भारत कराटे अकॅडमी सोलापूर च्या गणेश जाधव त्याचप्रमाणे प्रथमेश सुपाते या दोन्ही स्पर्धकांनी स्पर्धेत अद्वितीय कामगिरी सुवर्णपदक मिळविले सदर खेळाडूंना भारत कराटे अकॅडमीचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी सेन्साई विश्वजीत हेंबाडे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे महाराष्ट्र प्रमुख, मार्गदर्शक शिहान – रविंद्र सूर्यवंशी यांनी त्याचप्रमाणे कराटे दो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे जनरल सेक्रेटरी शिहान – संदीप गाडे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## घन आनंदात न्हाले.




..या मराठी भावगीत प्रीमियर लेखक दिग्दर्शक मंगल बी वाघमारे यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नेमकेच करण्यात आ-ले,प्रमुख पाहुणे म्हणून उप-स्थित मान्यवर व्यक्ती गौरव पवार गायक,सद्दाम शेख मेमक्री आर्टिस्ट,गीत संगीतबद्ध केलेले घनशाम पोस्ते,तसेच नाटक दिग्दर्शक युवराज सुतार, व कलाकार उमेश शिंदे,आणि राकेश भालेराव तसेच स्क्रिप्ट लेखक सचिन वाघमारे यांच्या सहकार्य ने या गीताच्या व्हिडिओ प्ले करून या गीताच्या व्हिडिओ अपलोड करण्यात आलातरी या गाण्याचे गायिका श्रुती आणि कल-ाकार देखील तीच असल्याने तिचे विशेष कौतुक करण्यात आले तसेच अप्रतिम शब्द लिखाण करून मंगल वाघमारे प्रस्तुत यांचे सुंदर आशी शब्द आगदी मनाला आनंद देणारे असे मराठी भावगीत या गाण्याचे संपूर्ण दिग्दर्शक करून सुंदर प्रयोग केला या बद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले




सौ.रेखा चंद्रकांत हरियाण यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे विरार वसई मद्ये जॉईट सेक्रेटरी पद मिळाल्या बदल अभिनंदन

# संजीव अहिरे जीवन गौरव पुरस्काराने जळगावात सन्मानित

नाशिक [ वृत्तसेवा साहेबराव नंदन ] म्हसदी ता. साक्री जि. धुळे येथील सध्या नाशिक येथे वास्तव्यास असलेले, विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारांचे मानकरी ठरलेले, महाराष्ट्र राज्य गुणवंत कामगार पुरस्कार्थी मितभाषी, उपक्रमशिल सेवावृत्तीचे सेवा निवृत प्रेस कर्मचारी संजीव काशिनाथ अहिरे यांना २०२४ चा बहुमानांकित आयुष्याच्या सांजसंध्येच्या दुस–या पर्वातील, वसुनंदिनी फाऊंडेशन आणि एम. के. व्हेंचर्सच्या जामनेर येथील संस्थेचा बहुमानांकित जीवन गौरव पुरस्कार नुकताच जळगाव येथे जेष्ठ श्रेष्ठ मा. श्री सुरेश मुळे जालना



अध्यक्ष महाराष्ट्र अखिल भारतीय बहुभाषिक महासंघ अध्यक्ष माऊली फाऊंडेशन , ॲड. मा. अविनाश जनार्दन भिडे नाशिक, सदस्य व मा. अध्यक्ष बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा कार्याध्यक्ष, सेंटरल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी , मा.लेखराज उपाध्याय , मा. श्री विश्वास विष्णू देशपांडे प्रसिद्ध लेखक चाळीसगाव, मा.डॉ. प्रकाश शंकरराव जोशी प्रसिद्ध गायक समाजसेवक ठाणे, मा. सौ. कल्पना रोहीदास सोनार समाजसेविका आणि पोलीस मित्र नाशिक, मा. सौ. सुचिता कुनघटकर प्रसिद्ध लेखिका व कवयित्री नागपूर, मा. दिलीप दीक्षीत जेष्ठ पत्रकार या मान्यवरांच्या शुभहस्ते टाळ्यांच्या गजरात प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदान सन्मान सोहळ्याचे आयोजन संस्थेच्यावतीने अध्यक्ष मा. श्री विद्याधर सोनवणे, संस्थापक सचिव मा . सौ. माधुरी कुळकर्णी यांनी ८ डिसेंबर २०२४ रोजी जळगाव येथील अल्पबचत भवनात केले होते. संजीव अहिरे यांना मिळालेल्या जीवन गौरव पुरस्काराचे सर्वच क्षेत्रातून कौतुकासह अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेतः हा गुणवंत कामगार परिषद नाशिक चे देवराम सैंदाणे, पोपराव देवरे, विलास गोडसे, सुनिल अवसरकर, प्रशांत कापसे, संजय पवार, राजधर देसले, रत्नाकर बागुल, दिलीप चव्हाण, राजेंद्र देवरे इत्यादी सह अनेक कवी लेखक साहित्यिक व संपादकांनी भरभरून अभिनंदन केले आहे.

## भगवद्गीता विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा स्त्रोत आहे - प्रा. प्रज्ञा पंडित



ठाणे: वर्तकनगर येथील ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या माध्यमिक शाळेत माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी गीताजयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. मानसी सूर्यवंशी आणि सौ. मृणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून ह. भ. प. प्रा. प्रज्ञा पंडित उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना भगवद्गीतेचे जीवनातील महत्त्व समजावून सांगत गीतेच्या तत्त्वज्ञानावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ङ्गगीतेचे विचार विद्यार्थी जीवनासाठी प्रेरणादायी असून ते आत्मविश्वास व संयम विकसित करतात. गीतेचा अभ्यास हा जीवनाला सकारात्मक दिशेने नेणारा मार्ग आह कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण नृत्य, मधुराष्टक पठण, गीतेच्या पंधराव्या अध्यायाचे पठण व गीता आरती करत गीताजयंती उत्सव संस्मरणीय केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. आव्हाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. लोहार यांनी केले. सौ. वैशाली हांडे, श्री. महाले, सौ. कविता चव्हाण, सौ. वृषाली आगीवले, श्री. गोसावी, श्री. दिनेश जाधव, सौ. कल्पना जानराव, श्री. किशोर चव्हाण, सौ. सुनीता सूर्यवंशी, श्री. जयदीप पाटील, सौ. नम्रता महाजन, सौ. देवरे यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचा-यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले. शाळेत साजरा झालेला हा गीताजयंती उत्सव विद्यार्थ्यांना गीतेच्या तत्वज्ञानाशी जोडणारा आणि जीवनातील मूल्ये समजावणारा एक महत्त्वाचा अनुभव ठरला.

## कवयित्री सौ. संगीताताई भामरे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

नाशिक [ वृतसेवा ] दहिवेल ता. साक्री, जि. धुळे येथील खांन्देशातील लोकप्रिय कवयित्री, वाणी समाज भूषण, विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारांच्या मानकरी ठरलेल्या, मितभाषी, साहित्य सेवावृत्ती जोपासणा-या व्रतस्थ सौ. संगीता अभय भामरे उर्फ माईफ यांना २०२४ चा बहुमानांकित वसुनंदिनी फाऊंडेशन आणि एम. के. व्हेंचर्सच्या जामनेर येथील संस्थेचा राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार नुकताच जळगाव येथे , जेष्ठ श्रेष्ठ मा. श्री सुरेश मुळे जालना अध्यक्ष महाराष्ट्र अखिल भारतीय बहुभाषिक महासंघ , अध्यक्ष माऊली फाऊंडेशन , ॲड. मा. श्री अविनाश जनार्दन भिडे नाशिक, सदस्य व मा. अध्यक्ष बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा कार्याध्यक्ष, सेंटरल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी , मा.लेखराज उपाध्याय , मा. श्री विश्वास विष्णू देशपांडे प्रसिद्ध लेखक चाळीसगाव, मा.डॉ. श्री प्रकाश शंकरराव जोशी प्रसिद्ध गायक समाजसेवक ठाणे, मा. सौ. कल्पना रोहीदास सोनार समाजसेविका आणि पोलीस मित्र नाशिक, मा. सौ. सुचिता कुनघटकर प्रसिद्ध लेखिका व कवयित्री नागपूर, मा. श्री दिलीप दीक्षीत जेष्ठ पत्रकार



या मान्यवरांच्या शुभहस्ते टाळ्यांच्या गजरात प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदान सन्मान सोहळ्याचे आयोजन संस्थेच्यावतीने अध्यक्ष मा. श्री विद्याधर सोनवणे, संस्थापक सचिव मा . सौ. माधुरी कुळकर्णी यांनी ८ डिसेंबर २०२४ रोजी जळगाव येथील अल्पबचत भवनात केले होते. सौ. संगीताताई भामरे यांना मिळालेल्या महाराष्ट्र रत्न पुरस्काराचे सर्वच क्षेत्रातून कौतुकासह अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेषतः ॲड. बापूसो. संभाजीराव पगारे, वैशालीताई वाणी, श्री अभय भामरे, सगर साहित्य सेवेचे संपादक कवी लेखक संपादक साहेबराव तात्या नंदन , कवयित्री सौ. सुनिता महाजन, सौ. सुरेखा आहेर , तान्हाजी खोडे, सौ. अलका माईणकर, श्री ललितकुमार साळवे, इत्यादी सह अनेक कवी लेखक साहित्यिक व संपादकांनी भरभरून अभिनंदन केले आहे.

## धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी संदर्भात सकल धनगर जमातीच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची घेतली भेट.


भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.सोमवार दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी संदर्भात सकल धनगर जमातीच्या शिष्टमंडळाने घेतली भेट.२० आगस्ट २०२४ रोजी सकल धनगर जमातीच्या वतीने भेटीसाठी राज्यपालांना निवेदन दिले होते त्या संदर्भात राज्यपालांनी ९ डिसेंबर २०२४ रोजी भेटीची वेळ दिली. धनगर समाजास एसटी आरक्षण अमंलबजावणी कशी कायदेशीर आहे याबाबत स्पष्टीकरण दिले.१९३५ ची जातगणना, महाराष्ट्र राज्यातील ६ कायदे, न्यायालयीन लढाई, अतिशय अनाकलनीय निकाल, आस्तित्व हिन धनगड बोगस दाखले, आदी बाबी कागदपत्रासह, पुराव्यानिशी दाखविल्या, तसेच आगस्ट २०२४ पासून युवकांनी सुरू केलेली चळवळ, पंढरपूर, संभाजी नगर, कळंबोली, नेवासा या ठिकाणी केलेली आंदोलने, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांनी दिलेले लेखी आश्वासन, शासनाला दिलेले सबळ पुरावे, धनगड आस्तित्वात नाही याचे पुरावे,पण धनगर आहेत असे लेखी तीन प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र



शासनाने दिले.आदी पुरावे सादर करून शेवटी भारतीय संविधान ३४२(१) नुसार राज्यपाल, राष्ट्रपती यांच्या मार्फत एखादी जमात आस्तित्व हिन जमातीला आरक्षण यादीतील दुरुस्ती करून आस्तित्वात असणा–या जमातीची दुरुस्ती करण्याबाबत सदर कलम चा वापर करता येतो,तसा २०१६ साली पुदूचेरी राज्यात ३४२(१) चा वापर करून इरुलर जमातीला एसटी आरक्षण दिले होते. आतापर्यंत १९५९ पासून २०१६ पर्यंत एकूण सात वेळा कलम ३४२(१) वापरून त्या त्या जमातीला न्याय मिळवून दिला.आम्ही ७० वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून संविधान हक्कापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले यामुळे आम्ही अपेक्षेने तुमच्या कडे दोन अडीच कोटी लोकांच्या अपेक्षा घेऊन आलो आहे.यावर राज्यपालांनी सर्व विषय ऐकून घेऊन मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करून पुढील कार्यवाही बाबत आपणास कळविण.सदर चर्चा मध्ये अनिल झोरे, गणेश केसकर,बिरु कोळेकर, रागिणी झोरे आदी उपस्थित होते.

# ॲड. बापूसो. संभाजीराव पगारे उर्फ मुक्तेय, यांना शिक्षण रत्न पुरस्कार जाहीर

नाशिक धुळे वृत्तसेवा ] सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान देणारे कार्य पाहाता, ज्ञानसिंधु प्रकाशन नाशिक या संस्थेच्या एक दिवसीय राज्यस्तरीय, साहित्य संमेलनात पिंपळनेर ता. साक्री, जि. धुळे येथील पिंपळनेर रत्न , सगर समाज रत्न , विविध पुरस्कारांचे मानकरी ठरलेले, उपक्रमशिल ध्येय वेडे कवी, लेखक, समाजभूषण , महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था पिंपळनेरचे अध्यक्ष ॲड. बापूसो. संभाजीराव यशवंतराव पगारे उर्फ मुक्तेय यांना २०२४ चा राज्यस्तरीय ज्ञानसिंधु शिक्षण रत्न पुरस्कार जाहीर केला असुन, तशा आशयाचे निवडपत्र ज्ञानसिंधुचे चिफप्रमोटर तान्हाजीराव खोडे यांनी नुकतेच आपल्या सहीनिशी दिल्याचे सांगितले. संभाजीराव पगारे यांना या आधी, आपल्या जन्मगावी पिंपळनेरच्या काळ्या मातीतला बहुमानाकिंत, बहुचर्चित, प्रतिष्ठेचा समजला जानारा पिंपळनेर रत्न पुरस्कार देखिल प्राप्त झाला आहे. ते कवी असून त्यांचे दोन कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. खोल मनाच्या गुहेत व हळवे हुंकार मनाचे. दोन्ही संग्रहाचे प्रकाशन ख्यातनाम लेखक साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते धुळे येथे साग्रसांगित पार पडले आहेत. पुरस्कारा निमित्त समाजाला साहित्य जगताला त्यांचा परिचय व्हावा याउद्देशाने थोडक्यात लेखन प्रपंच मांडण्याचा प्रयत्न संभाजीराव यांचे शिक्षण एम.एस्सी. ॲग्री. एल.एल.बी. असून, त्यांनी सुरुवातीच्या काही काळात शिक्षकी पेशा सह वकीली देखील केली आहे. सध्या शेती, व शिक्षण सेवा समाज कार्याला वाहून घेतले आहे. वकीली १९८० ते २००५ / नोकरी १९७३ कोल्हापूर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी. विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे व कर्म. आ. मा. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर या दोन्ही महाविद्यालयात एम. लॉ.


॥ ज्ञानसिंधु प्रकाशन ॥
ISBN ॥ आकर्षक मुखपृष्ठ ॥ वितरण ॥ ई-बुक
प्लॉट नं. १७०/गट नं. १८४ जय गणेश कॉलनी श्रमिकनगर, सातपूर नाशिक - ४२२०१२
मो. ९८२३३१६८३८ / ७०४०८१८३८५
dnyansindhup@mail.com, mahilavishw@gmail.com

जा. क्र. Dnyp/Aw/२१/०२४ दि. ०४.१२.२०२४

‘ पुरस्कारार्थी निवड पत्र ’

प्रती,
मा. श्री./ सौ. ॲड. संभाजी य. पगारे

महोदय,

आपले सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान देणारे कार्य पाहता ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक या संस्थेच्या एकदिवसीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनात आपणास राज्यस्तरीय ज्ञानसिंधु शिक्षण रत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी आपण सहकुटुंब दिनांक २१/१२/२०२४ शनिवार रोजी ठिक १२.०० वाजता राणी भवन, अशोक स्तंभ चौक, नाशिक येथे पुरस्कार स्विकारण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावासह उपस्थित राहावे. ही विनंती.

अभिनंदन !

प्रकाशक
श्री. तान्हाजी खोडे
ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक
मो. ९८२३३१६८३८

प्राध्यापक सन १९८५ ते १९ ९८ / संचालक म्हणून ते महाराष्ट्र शासन वन विकास महामंडळ १९९६ ते १९९९ सदस्य जिल्हा नियोजन व विकास मंडळ, धुळे जिल्हा १९९६ ते १९९८ / जिल्हा सरचिटणीस, भाजपा, धुळे जिल्हा १९९३ ते १९९९ जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी धुळे जिल्हा २००६ ते २०10 प्रदेश कार्यकारिणी सदस्य भाजपा २०10 ते २०२० अध्यक्ष:महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था, पिंपळनेर, ता. साक्री, अध्यक्ष : स्वामी विवेकानंद सार्व. वाचनालय पिंपळनेर, अध्यक्ष : स्वातंत्र्यवीर सावरकर ग्रामविकास व सार्वजनिक वाचनालय मैंदाणे, ता. साक्री, जि. धुळे कार्याध्यक्ष : आदिवासी आश्रमशाळा संस्थाचालक संघटना, महाराष्ट्र राज्य सामाजिकदृष्ट्या अध्यक्ष ते धुळे जिल्हा ग्रंथालय संघ २००० ते २००८ अध्यक्ष : नाशिक विभाग ग्रंथालय संघ २००९ पासून उपाध्यक्ष : महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, संचालक धोंडू शामराव गरुड जिल्हा वाचनालय , धुळे . अध्यक्ष अखिल भारतीय माळी महासंघ २००१ ते २० १८, मानद अध्यक्ष : अखिल भारतीय माळी महासंघ २०१८ पासून. संयोजक शबरी कुंभ आयोजन समिती धुळे जिल्हा २००६ / त्यांना मिळालेले पुरस्कार सगर रत्न २ ] पिंपळनेर रत्न तसेच समाजात आर्थिक बौध्दीक ज्ञानदान प्रबोधन करण्यात ते नेहमी व्यस्त असतात. समाजातील आर्तपिडीत गोरगरीब कुटूंबातील मुलामुलींच्या अडीनडीला शिक्षणासाठी नेहमीच आर्थिक मदत बौद्धीक मार्गदर्शन करण्यात त्यांचा हातखंड आहे. शेकडो विद्यार्थांना त्यांनी सर्वतोपरी मदत केल्याने, समाजात त्यांची ख्याती आहे. योग्य व्यक्ति, योग्य निवड, योग्य पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे.

